# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### मुंबईतील सहकारी गृहनिर्माण संस्थामध्ये उपविधीचा गैरवापर व फेरफार करुन सदनिकाधारकांना जाचक अटी लावल्याबाबत

**(१) २१५८ (१८-०३-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: मुंबईतील अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थामध्ये उपविधीचा गैरवापर व फेरफार करून सदनिकाधारकांना जाचक अटी लावण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये सदनिका खरेदीदारास बँकेकडे कर्ज मिळण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र न देणे, जातीवाचक किंवा धार्मिक किंवा आहारवाचक (शाकाहारी/मांसाहारी) अशा व्यक्तींनाच सदनिका विकण्याची सक्ती करणे, सदनिका विकताना अनेक अडचणी निर्माण करणे इत्यादी प्रकार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारच्या तक्रारी शासन दरबारी केल्या असताना देखील त्याची दखल घेतली जात नसल्याच्या वारंवार निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशाप्रकारे सदनिकाधारकांना त्रास होऊ नये यासाठी शासनाने चौकशी करुन कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१७-१२-२०२०)** : (१) व (२) अंशत: खरे आहे.

राज्यातील मुंबई शहर, मुंबई उपनगर व पुणे या जिल्हयामध्ये ३२ सहकारी गृहनिर्माण संस्थांनी सभासदांना सदनिका हस्तांतरण करण्यासाठी, बँक कर्ज मिळण्याकरीता, सदनिका विक्री करण्यासाठी, गृहतारण कर्ज घेण्याकरीता ना-हरकत प्रमाणपत्र देत नसल्याबाबत आणि सभासदत्व देत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

तथापी, जातीवाचक किंवा धार्मिक तसेच, आहारवाचक (शाकाहारी /मांसाहारी) व्यक्तींनाच सदनिका विकण्याची सक्ती करणे, अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) हे खरे नाही.

(४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये अर्जदाराने कोणत्याही प्रयोजनाकरीता प्रमाणपत्र मिळणेसाठी संस्थेकडे केलेल्या अर्जावर विहित मुदतीत निर्णय घेण्यात संस्थेने कसूर केली असेल किंवा अर्ज फेटाळला असल्यास त्याबाबत अर्जदारास निबंधकाकडे अपील दाखल करता येते. कायदयातील तरतुदीनुसार संबंधित निबंधकांकडून कारवाई करण्यात येते.

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, तसेच या सूचनांच्या विपरित गृहनिर्माण संस्थांनी नियम तयार करु नयेत, ही बाब राज्यातील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निदर्शनास आणून देणेबाबत शासनस्तरावरुन सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार त्यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निदेश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये कंत्राटी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना पदावर नियमित करण्याबाबत

**(२) २८७६ (१७-०४-२०१५) डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये कंत्राटी पध्दतीने किती शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नेमलेले आहेत,

(२) असल्यास, त्यांना नियमित पदावर घेण्याविषयी शासनाची भूमिका काय आहे,

(३) सद्य:स्थितीत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना किती मानधन दिले जात आहे ?

**ॲड. के.सी.पाडवी (२१-१२-२०२१)** : (१) सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षात कंत्राटी पध्दतीने शिक्षक २०० व शिक्षकेतर २५५८ असे एकूण ४७५८ कर्मचारी शिक्षक व शिक्षकेतर म्हणून नेमलेले आहे.

(२) स्पर्धात्मक परिक्षेव्दारे होणाऱ्या भरती प्रक्रियेत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना नियमित पदावर नियुक्ती दिली जाते.

(३) सद्य:स्थितीत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे मानधन देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | क. महा. शिक्षक | रुपये १५०/- प्रति घड्याळी तास |
| २. | माध्यमिक शिक्षक | रुपये १४०/- प्रति घड्याळी तास |
| ३. | पदवीधर प्राथ. शिक्षक | रुपये १४०/- प्रति घड्याळी तास |
| ४. | प्राथमिक शिक्षक | रुपये १२५/- प्रति घड्याळी तास |
| ५. | स्वयंपाकी | रुपये ४१६/- प्रति दिन |
| ६. | कामाठी | रुपये ४१६/- प्रति दिन |
| ७. | चौकीदार | रुपये ३००/- प्रति दिन |
| ८. | शिपाई | रुपये ३००/- प्रति दिन |
| ९. | सफाईगार | रुपये ३००/- प्रति दिन |
| १०. | प्रयोगशाळा परिचर | रुपये ३००/- प्रति दिन |

| | | |
|---|---|---|
| ११. | वाहनचालक | रुपये ४१६/- प्रति दिन |
| १२. | अधीक्षक | रुपये ९०००/- प्रति दिन |
| १३. | स्त्री अधिक्षिका | रुपये ९०००/- प्रति दिन |

---

## महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(३) ३०९४ (२९-०५-२०२०) अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सातवा वेतन आयोग पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याच्या मागणीसाठी दिनांक २० मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास कृषी विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी धरणे आंदोलनास बसले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विद्यापीठ परिनियम, १९९० अन्वये नियम क्र.१३८ नुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे कृषी विद्यापीठ सेवेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवेतील नियम व सेवा शर्ती जशास तशा लागू आहेत मात्र कृषी विद्यापीठ सेवेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू न झाल्यामुळे त्यांच्यात असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कृषी विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१८-१२-२०२०) :** (१) नाही.

सातवा वेतन आयोग पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याच्या मागणीसाठी दिनांक २० मार्च, २०२० रोजी महात्मा फुले कृषी विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी धरणे आंदोलनास बसणार असल्याबाबत शासनास कळविण्यात आले होते. परंतु, कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपाययोजनांमुळे सदरहू आंदोलन स्थगित करण्यात आले.

(२) होय, हे खरे आहे.

(३) राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत वित्त विभागाने सहमती दर्शविलेली आहे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याची कार्यवाही चालू आहे.

वित्त विभागाने दिनांक ०४ मे, २०२० रोजी कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय उपाययोजना करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबतचे अभिप्राय वित्त विभागाकडून प्राप्त झाले आहेत. सातवा वेतन आयोग लागू करताना विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त करून घ्यावे, असे वित्त विभागाचे मत आहे, त्यानुषंगाने विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त करून घेण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आशा अंगणवाडी सेविकांना साहित्य, कोविड भत्ता व मोबदला मिळण्याबाबत

**(४) ३२४० (३१-०५-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.जयंत पाटील, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत आशा स्वयंसेवक योजना सुरु असून ग्रामीण व शहरी भागात काम करणाऱ्या आशा वर्कर्सना केंद्र व राज्य शासनाकडून रुपये दोन हजार मानधन अदा करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ७५ हजार आशा स्वयंसेविका आणि ३५०० गट प्रवर्तकांचे माहे जानेवारी, २०२० ते आजमितीपर्यंतचे मानधन थकीत असल्याची तसेच टाळेबंदी काळात आरोग्यविषयक माहिती संकलनाचे काम करणाऱ्या आशा अंगणवाडी सेविका मोबदल्यापासून वंचित असल्याचे दिनांक १ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आशा अंगणवाडी सेविकांना कोरोनाच्या सर्व्हेक्षणाची जबाबदारी दिली असताना सुरक्षिततेच्यादृष्टीने आवश्यक ते साहित्य पुरविले गेले नसल्याचे निदर्शनास आले असून जिल्हा परिसरात जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या सदर सेविकांना कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक साहित्य व मोबदला न मिळण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच, सिटूच्या माध्यमातून केलेल्या आंदोलनानंतर आशा वर्कर्सच्या मानधनात दुपटीने वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असतानाही त्यांची अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आशा अंगणवाडी सेविकांना आवश्यक साहित्य, कोविड भत्ता व मोबदला तसेच ३५०० गट प्रवर्तकांचे थकीत मानधन मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२९-१०-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये केंद्र शासनाने मंजूर केलेल्या ६१ बाबींपैकी ४ निवडक बाबींकरीता रुपये २०००/- दरमहा इतका मोबदला आशांना अदा करण्यात येत आहे. तसेच या मोबदल्याच्या सम प्रमाणात आशा स्वयंसेविकांना रुपये २०००/- पर्यंत दरमहा तसेच गटप्रवर्तकांना रुपये ३०००/- पर्यंत दरमहा राज्य शासनाच्या निधीतून मोबदला अदा करण्यात येत आहे. बाकीच्या बाबींकरीता कामावर आधारित मोबदला आशा स्वयंसेविकांना देण्यात येत आहे.

वि.प. १ (७)

(२) व (३) हे खरे नाही.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना आशा स्वयंसेविकांना कोविड-१९ संरक्षणात्मक साधने उपलब्ध करुन देणेबाबत दुरचित्रसंवादाव्दारे होणाऱ्या बैठकीत तसेच दिनांक २२/०५/२०२० रोजी मोबदला अदा करणेबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(४) हे खरे नाही.

मंत्रिमंडळाच्या निर्णयाप्रमाणे मोबदला दिला जात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शेतकऱ्यांना खरीप हंगामात बि-बियाणे व खते उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५) ३३९१ (०२-०६-२०२०) श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांना खरीप हंगामात बि-बियाणे व खते शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचविण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून दिनांक ३१ मे, २०२० पूर्वी पोहचविण्याच्यादृष्टीने मा.कृषी मंत्री यांनी घेतलेल्या जिल्हा आढावा बैठक दूरदुष्टीप्रणालीव्दारे कृषी विभागाला निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना लागणारी बि-बियाणे व खते उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने नियोजन केले आहे काय व हेक्टरी किती बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१६-१२-२०२०) :** (१) होय.

(२) राज्यात शेतकऱ्यांच्या बांधावर शेतकरी गटामार्फत विविध कृषी निविष्ठांचा पुरवठा होण्यासाठी कृषी विभागातील अधिकारी/कर्मचारी यांनी ग्राम पातळीवर कृषी सेवा केंद्र व शेतकरी गट यामध्ये समन्वयक म्हणून काम केले आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर कृषी निविष्ठ पुरवठा मोहिमेनुसार दिनांक २३/०८/२०२० अखेर १,९७,३६७.७७ क्विंटल बियाणे व २,७९,३४९.८८ मे.टन खत पुरवठा झालेला आहे व कापूस बियाणे ६,२५,९५८.११ (पाकीटे) चा पुरवठा झाला आहे. या व्यतिरिक्त खरीप हंगाम २०२० करीता १६.१५ लाख क्विंटल (११२.८२ टक्के) बियाणे पुरवठा झालेला आहे तसेच रब्बी हंगामाकरीता दिनांक १७/११/२०२० अखेर ७.४५ लाख क्विंटल बियाणे पुरवठा झालेला आहे. या व्यतिरिक्त खरीप हंगाम २०२० करीता दिनांक ३०/०९/२०२० अखेर ४२.८७ लाख मे.टन खताचा पुरवठा झालेला आहे. रब्बी हंगामाकरीता दिनांक १७/११/२०२० अखेर ७.७२ लाख मे.टन खताचा पुरवठा झालेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना स्वस्त धान्य वितरित करण्याबाबत

**(६) ३८९७ (२०-०८-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना स्वस्त धान्य दुकानामधुन वितरित केल्या जाणाऱ्या धान्याचा दुकानदाराकडून अपहार होत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडे अनेक तक्रारी आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषी दुकानदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (११-१२-२०२०) :** (१) नियंत्रक शिधावाटप, मुंबई, अमरावती, नाशिक, कोकण तसेच औरंगाबाद विभागातील लातूर जिल्ह्यात ही बाब निदर्शनास आली आहे. नागपूर विभागात ही बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) होय.

(३) या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेस्तरावर चौकशी करण्यात येऊन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

७२ रास्तभाव दुकाने निलंबित करण्यात आली असून ८७ रास्तभाव दुकानदारांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. तसेच, ५० रास्तभाव दुकानदारांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून ८४ रास्तभाव दुकानदारांची १००% अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, २१ रास्तभाव दुकानदारांवर दंड आकारण्यात आला असून २२ रास्तभाव दुकानदारांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवापूर (जि.नागपूर) तालुक्यातील अवैध सावकाराकडून एका शेतकऱ्यांच्या पत्नीची गैरवर्तणुक केल्याबाबत

**(७) ३९६७ (३१-०७-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवापूर (जि.नागपूर) तालुक्यातील अवैध सावकाराकडून एका शेतकऱ्यांच्या पत्नीची साडी सोडण्याचा व तीला मारहाण करण्याचा प्रकार दिनांक २४ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले तद्‌नुसार अवैध सावकारी करणाऱ्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१५-१२-२०२०) :** (१) व (२) सदर प्रकार घडल्याची बातमी दिनांक २४/०६/२०२० रोजीच्या मराठी दैनिक “लोकमत” मध्ये प्रसिध्द झालेली आहे. त्याबाबत संबंधित पिडीत महिलेचे पती श्री.शेषराव हेमराज चौधरी यांनी सावकार श्री.अभयचंद्र पाटील यांचेविरुध्द पोलीस स्टेशन, भिवापूर येथे तक्रार क्र. ५४८/२०२० दाखल केली आहे.

श्री.शेषराव हेमराज चौधरी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येऊन संबंधित सावकाराविरुध्द महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतुदीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून सावकारास पोलीस कोठडीत ठेवण्यात आले होते. सद्य:स्थितीत सावकाराची जामिनावर सुटका झालेली आहे.

दरम्यान संबंधित सावकाराकडील आक्षेपार्ह दस्तऐवज ताब्यात घेण्यात आले असून महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमातील तरतुदीनुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, उमरेड यांचेस्तरावरुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अनेक खाजगी शाळांनी विद्यार्थ्यांकडून वार्षिक शुल्क वसुल केल्याबाबत

**(८) ४८०५ (१२-११-२०२०) श्री.विलास पोतनीस, श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र दराडे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनामुळे शाळा व्यवस्थापनाने शुल्क वाढ करु नये तसेच २०१९-२०२० या काळातील थकीत शुल्क एक रक्कमी वसूल करण्यात येवू नये, ती टप्प्या टप्प्याने घेण्यात यावी असा निर्णय शासनाने घेऊन या प्रकरणीचा अध्यादेश दिनांक ०८ मे, २०२० रोजी काढला असून असोसीएशन ऑफ इंडियन स्कूल, ग्लोबल एज्युकेशन फॉऊंडेशन, ज्ञानेश्वर माऊली संस्था आणि नवी मुंबईतील कासेगाव एज्युकेशन ट्रस्टने या अध्यादेशाला विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लॉकडाऊनच्या काळात शाळा बंद, दरवर्षीप्रमाणे यावर्षी शाळांना होणारा खर्च कमी त्यामुळे शुल्क माफी करावी तसेच ऑनलाईन शिक्षणाबाबत बालकांवर होणारे परिणाम व असलेले धोके आदींबाबत न्याय मिळण्यासाठी आठ राज्यातील पालकांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अधिनियम, २०११ च्या तरतुदीनुसार विनाअनुदानित शाळांतील शुल्क वाढ नियंत्रण करण्याचा अधिकार शासनाला नसल्याने मा.उच्च न्यायालयाने या आदेशाला स्थगिती दिल्यामुळे संस्थाचालकांवर कोणतेही बंधन नसल्याने शाळा शुल्क वाढ करीत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पालकांच्या अडचणी समजून घेत शासनाने सन २०२०-२०२१ या वर्षात शुल्क वाढ न करण्याचा निर्णय घेतला असून तसेच राज्यातील शाळा बंद असतानाही राज्यातील अनेक खाजगी शाळांनी विद्यार्थ्यांच्या पालकांकडे संगणक शुल्क, सत्र शुल्क, शालेय वाहनाचे शुल्क, प्रयोगशाळा शुल्कासह वार्षिक शैक्षणिक शुल्क भरण्याची सक्ती सुरु केल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, कोरोना संक्रमणामुळे आर्थिक अडचणीत असलेले पालक शालेय शुल्क भरण्यास असमर्थ ठरल्यास त्यांच्या पाल्यांना पहिला सत्राचा निकाल न देणे, ऑनलाईन वर्गांची लिंक न देणे अशी अडवणूक खाजगी शाळांनी सुरु केल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये नाराजी निर्माण झाली असून याबाबत शिक्षण विभागाकडे तक्रारी केल्यास शाळांना केवळ कारवाईचा इशारा देण्यात आला परंतु प्रत्यक्षात कारवाई मात्र करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शुल्क वाढ व एक रकमी थकीत शुल्क वसुली करु नये या निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या तसेच शासन निर्णयाकडे दुर्लक्ष करित विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क वसूल करणाऱ्या शाळा व संस्थावर कारवाई करुन रक्कम कमी करण्याबाबत व शाळा सुरू करण्यासंदर्भात कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) अंशत: खरे आहे.
(५) व (६) शासनाने निर्गमित केलेल्या दिनांक ०८ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयास मा.उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असून मा.उच्च न्यायालयाने दिनांक २६/०६/२०२० रोजी अंतरीम स्थगिती दिली असून सद्य:स्थितीत प्रकरणी न्यायप्रविष्ट आहे.

---

## वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्यातील संस्थामधील कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत

**(९) ४९६५ (२४-११-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील विविध संस्थांमध्ये एकूण ९२५ बदली कर्मचारी कार्यरत असून त्यापैकी ज्या कर्मचाऱ्यांची सेवा दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार न्यायालयाच्या आदेशाशिवाय सलग १० वर्षे व प्रत्येक आर्थिक वर्षात २४० दिवस झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी शासन सेवेत सामावून घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) सदर प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१६-१२-२०२०) :** (१) व (२) प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्याची छाननी करण्यात येत आहे. छाननीअंती उचित निर्णय घेण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## काजू उद्योगाला मुल्यवर्धित कराचा (व्हॅट) परतावा देण्याबाबत व काजूपासून तयार होणाऱ्या फेणीला कर सवलत देण्याबाबत

**(१०) ४९७३ (२३-११-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काजू उद्योगाला मुल्यवर्धित कराचा (व्हॅट) परतावा देण्याबाबत आणि काजूपासून तयार होणाऱ्या फेणीला कर सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व प्रस्तावाबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) तसेच, सदर प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२९-१२-२०२०) :** (१) व (२) राज्यातील काजू प्रक्रिया उद्योग घटकांनी राज्यामधील उत्पादीत व प्रक्रिया केलेल्या काजूपैकी महाराष्ट्र राज्यामध्ये अंतिमत: विक्री झालेल्या काजूच्या विक्रीवर मुल्यवर्धित कर भरल्यानंतर संबंधित उद्योग घटकास त्या कराची संपूर्ण रक्कम प्रोत्साहन अनुदान म्हणून परत करण्याबाबतची योजना दिनांक १५/०७/२०१० व दिनांक १२/०३/२०१३ शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली होती.

तथापि, देशात दिनांक ०१/०७/२०१७ पासून वस्तू व सेवा कर (GST) प्रणाली लागू करण्यात आली असून राज्यांतर्गत विविध करांची पुनर्रचना होऊन त्यांचे एकाच करात रुपांतर झाले आहे. काजू प्रक्रिया उद्योग संघटनांमार्फत ढोबळ राज्य वस्तू व सेवा कर (Gross SGST) प्रोत्साहन अनुदान म्हणून परत करण्याबाबत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. सदर मागण्याबाबत शासनस्तरावर विचार करण्यात येऊन, विचाराअंती राज्यातील काजू प्रक्रिया उद्योग घटकांनी राज्यामध्ये उत्पादीत व प्रक्रिया केलेल्या काजूपैकी महाराष्ट्र राज्यामध्ये अंतिमत: विक्री झालेल्या काजूच्या विक्रीवर दिनांक ०१/०४/२०२० पासून देय असलेला वस्तू व

सेवा कर (GST) भरल्यानंतर त्यापैकी १०० टक्के ढोबळ राज्य वस्तू व सेवा कर (Gross SGST) प्रोत्साहन अनुदान म्हणून काजू प्रक्रिया उद्योगास प्रदान करण्याबाबतचा शासन निर्णय सविस्तर कार्यप्रणालीसह दिनांक ०२/१२/२०२० रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

काजूपासून तयार होणाऱ्या फेणीला कर सवलत देणे हा विषय राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अखत्यारीतील आहे. या संदर्भात त्या विभागाने असे कळविले आहे की, मळीपासून तसेच इतर पदार्थापासून निर्मित होणाऱ्या देशी मद्यावर प्रती प्रुफ लिटर रुपये १३५/- इतके उत्पादन शुल्क आकारण्यात येते. तथापि, फेणी हा देशी मद्याचा प्रकार असल्याने, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या दिनांक २०/०७/२००५ च्या अधिसूचनेनुसार काजू बोंडापासून फेणी तयार केल्यास रुपये १०/- प्रती प्रुफ लिटर इतके उत्पादन शुल्क आकारण्यात येते. काजू फेणी निर्मितीस उत्पादन शुल्क दरात आधीच सवलत दिली असल्याने, आणखी कर सवलत देण्याबाबत नवीन प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आडाळी (ता.दोडा मार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथील राष्ट्रीय वनौषधी संशोधन प्रकल्प राबविण्याबाबत

**(११) ४९७८ (१७-११-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने आडाळी (ता.दोडा मार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथे आयुर्वेदिक संशोधन केंद्र प्रकल्पास मंजूरी दिली असून १०० कोटीच्या या प्रकल्पामुळे जिल्ह्यात रोजगार निर्मितीला चालना मिळणार असून जिल्ह्यातील ७५० गावांमध्ये ५०० हून अधिक असलेल्या वैद्यांच्या ज्ञानाचा कोकणवासियांना आरोग्याच्यादृष्टीने फायदा होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय आयुष मंत्रालयाने आडाळी संशोधन केंद्र प्रकल्प मंजूर केल्यानंतर शासनाने आडाळी एमआयडीसी येथील आवश्यक ती जमीन देण्याचे निश्चित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आडाळी येथील राष्ट्रीय वनौषधी संशोधन प्रकल्प अन्यत्र हलविल्यास सदरहू प्रकल्प अन्य राज्यासाठी मंजूर करण्यात येईल असे केंद्रीय आयुष मंत्रालयाने शासनास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आडाळी एमआयडीसीतील ७०० एकर जागा यासाठी संपादीत असून १०० एकर जागा प्रकल्प साकारण्यासाठी आवश्यक आहे, तसेच, सिंधुदुर्ग जिल्हयात मोठ्या प्रमाणात वनौषधी वनस्पती उपलब्ध असताना सदरहू प्रकल्प लातूर येथे स्थलांतरीत करण्याची प्रक्रिया सुरू करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, आडाळी वनौषधी संशोधन प्रकल्प अन्यत्र स्थलांतरीत करण्यास कोकणातील लोकप्रतिनिधींनी विरोध दर्शविला असून त्याबाबतचे एक सविस्तर निवेदन मा.मुख्यमंत्र्यांना सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने केंद्रीय आयुष मंत्रालयाने मंजूर केलेला राष्ट्रीय वनौषधी संशोधन प्रकल्प, आडाळी येथेच राबविण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१०-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) अंशत: खरे आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचे आदेश वित विभागाव्दारे निर्गमित करण्यात आल्याबाबत

**(१२) ५०१७ (१४-११-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.निलय नाईक, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय कार्यालयातील वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचे आदेश वित्त विभागाव्दारे निर्गमित करण्यात आल्याचे दिनांक ७ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे शासकीय सेवेतील सुमारे सव्वा लाख रिक्त पदे भरली जाणार नसल्यामुळे उक्त शासकीय धोरणाला शासकीय कर्मचारी संघटनेचा विरोध असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ३४ जिल्ह्यातील ७२ हजार विविध पदांकरीता एका उमेदवाराने अनेक पदांसाठी तीन ते चार हजार रूपये खर्च करून अर्ज केलेले असून उमेदवारांनी खुल्या जागेकरीता रूपये ४००/- तर मागासवर्गीय प्रवर्गाकरीता रूपये २००/- परीक्षा शुल्क अदा केले असल्यामुळे सर्व उमेदवारांचे मिळून एकूण १३० कोटी रूपये रक्कम वाया गेल्यामुळे सुशिक्षित बेरोजगारांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासन फेरविचारांती उक्त निर्णय रद्द करुन प्रतिक्षेत असलेल्या सुशिक्षित बेरोजगार तरुणांची मेगा भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१५-१२-२०२०) :** (१) नाही. फक्त कुशल व अकुशल काल्पनिक पदांवर बाह्ययंत्रणेव्दारे संस्था/कंपनी यांच्यामार्फत सेवा घेताना पदवीधर अंशकालीन उमेदवारांना प्राधान्य देण्याबाबत वित्त विभाग, शासन परिपत्रक, दिनांक ३०/०९/२०२० अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) वित्त विभागाच्या दिनांक १६/०५/२०१८ च्या शासन निर्णयान्वये व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये शेतकऱ्यांना सुविधा पुरविण्यासाठी महत्त्वाच्या सेवेशी निगडित असलेली रिक्त पदे भरण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

तथापि, कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे अर्थव्यवस्थेवरील परिणाम व वित्तीय उपाययोजनांतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग वगळता अन्य विभागातील नविन पद भरतीवर तात्पुरत्या कालावधीसाठी निर्बंध घातले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(१३) ५०७३ (१२-११-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किमान वेतन कायद्यानुसार अठरा हजार वेतन मिळणे बंधनकारक असताना सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन हे सहा हजार मानधनावर काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करून सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन कालावधी कमी करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (१७-१२-२०२०) :** (१) शासन निर्णय, दिनांक १७/०९/२०११ अन्वये दिनांक ०१/०१/२०१२ पासून प्राथमिक शिक्षण सेवकांना रुपये ६०००/-, माध्यमिक शिक्षण सेवकांना रुपये ८०००/- व उच्च माध्यमिक शिक्षण सेवकांना ९०००/- असे मानधन दिले जाते.
(२) व (३) प्रस्ताव तपासण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी शहरात अद्ययावत रूग्णालय उभारण्याबाबत

**(१४) ५०८९ (१३-११-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहरात ६० खाटांचे अद्ययावत रूग्णालय तसेच इतर सुविधांबाबत शासनाच्या नगर विकास विभागाने परभणी महानगरपालिकेस ५ कोटी रूपयांचा निधी सन २०२० मध्ये मंजूर करुनही रूग्णालयासाठी जागा उपलब्ध नसल्याने सदर निधी अखर्चित राहिलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपलब्ध निधी व रूग्णाची होणारी अडचण लक्षात घेता ६० खाटांचे अद्यावत रूग्णालय उभारणीसाठी शासनस्तरावरून जागा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची थोडक्यात सविस्तर माहिती व सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०७-०१-२०२१) :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सामुहीक आरोग्य केंद्र (UPHC) आयुक्त, आरोग्य सेवा संचालनालय, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे पत्र दिनांक २२ जून, २०२० अन्वये मंजूर झाले असून UPHC बांधकामाबाबतची प्रक्रिया सुरु केली आहे.

(२) या आरोग्य केंद्र बांधकामासाठी महानगरपालिकेची स.नं. २८१ मधील जागा उपलब्ध आहे. त्यामुळे रुग्णालय उभारणीसाठी शासनस्तरावरुन जागा उपलब्धतेचा प्रश्नच उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत आहे.

---

## वनपरिक्षेत्र मलकापूर (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथे अवैद्य खदान (बॉक्साईड) व वन विषयक स्थळदर्शन कामात अपहार झाल्याबाबत

**(१५) ५०९८ (२३-११-२०२०) श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) यांचे कार्यक्षेत्रात सन २०१६ पासून अनेक वन विषयक कामे करण्यात आली असून सदर कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली असून बनावट अभिलेखांच्या आधारे अपहार झालेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याविषयीच्या अनेक तक्रारी शासनास प्राप्त झाल्या असून, आपले सरकार पोर्टल तक्रार (dist/ZPKL/२०२०/१७४९) व्दारे श्री.दिलीप अहिरे, सामाजिक कार्यकर्ता, नाशिक यांनी देखील शाहुवाडी वन विभागातील अधिकाऱ्यांच्या अपहाराच्या अनेक तक्रारी शासनाकडे दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वनपरिक्षेत्र मलकापूर (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) या परिक्षेत्रातील सन २०१६ ते आज अखेरपर्यंत स्थळदर्शक, वन विषयक कामांचे रोखालेखा फॉर्म नंबर ३२, ३५ व मजुरांचे देयके आरटीजीएस व जेएफएम समितीच्या शासकीय बँक खात्यावरील निधीच्या विनियोगाची चौकशी व संबंधित वनक्षेत्रपाल व समितीचे सदस्य सचिव, वनपाल यांची स्थावर मालमत्तेची चौकशी होणेबाबत शासनास दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त विषयी तक्रारदारांकडून अनेक तक्रारी, निवेदने व सबळ पुरावे शासनास दाखल होऊनही शासनाकडून शाहूवाडी वनपरिक्षेत्रातील अपहाराची चौकशी करण्यात आली आहे काय तसेच चौकशीअंती संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (१४-१२-२०२०)** : (१) हे खरे नाही.

(२) श्री.दिलीप अहिरे, नाशिक यांनी आपले सरकार पोर्टलवर (dist/ZPKL/२०२०/१७४९) अन्वये केलेली तक्रार वन विभागास कार्यवाहीसाठी प्राप्त झालेली नाही. तथापि, सदर तक्रार जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडे प्राप्त झालेली असून, सदर तक्रारीच्या अनुषंगाने गटविकास अधिकारी, शाहूवाडी यांनी आवश्यक कार्यवाही करून तक्रार निकाली काढणेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

तसेच, श्री.दिलीप अहिरे, नाशिक यांनी आपले सरकार पोर्टलवर कोल्हापूर वन विभागातील मलकापूर वनपरिक्षेत्रातील वन विषयक कामांबाबत तीन तक्रारी केलेल्या आहेत. सदर तिन्ही तक्रारी एकाच विषयाशी संबंधित आहेत. तक्रारदाराने केलेली तक्रार ढोबळ स्वरुपाची असून त्यासोबत कोणतेही सबळ पुरावे सादर केलेले नाहीत. तथापि, सदर तक्रारीची चौकशी केली असता त्यामध्ये प्रथमदर्शनी कोणतेही तथ्य आढळून आले नाही. त्याबाबतचा अहवाल उपवनसंरक्षक (प्रा.) कोल्हापूर यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना अहवाल सादर केलेला आहे.

मलकापूर वनपरिक्षेत्रातील संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे सन २०१९-२०२० पर्यंतचे लेखापरिक्षण सनदी लेखापाल यांचेकडून पूर्ण करण्यात आलेले आहे. त्यामध्ये देखील कोणतीही वित्तीय अनियमितता झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास वन विभागास निवेदन प्राप्त झालेले नाही.

(४) श्री.दिलीप अहिरे, नाशिक यांनी आपले सरकार पोर्टलवर केलेल्या तक्रारी ढोबळ स्वरुपाच्या असून त्यासोबत कोणतेही सबळ पुरावे सादर केलेले नाहीत. तथापि, सदर तक्रारीची चौकशी केली असता त्यामध्ये प्रथमदर्शनी कोणतेही तथ्य आढळून आले नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय कर्मचारी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना अर्जित रजा रोखीकरणाबाबत

**(१६) ५१२५ (१२-११-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कर्मचारी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना अर्जित रजा रोखीकरण शासन परिपत्रकानुसार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे शिक्षकांना त्याचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-१२-२०२०)** : (१) अंशत: खरे आहे. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अर्जित रजा रोखीकरण अनुज्ञेय आहे.

(२) व (३) सदर बाब तपासण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबई शहरात पावसाच्या पाण्याचा निचरा करणाऱ्या होल्डिंग पॉडमध्ये गाळाचे साम्राज्य पसरल्याबाबत

**(१७) ५१६५ (२०-११-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहरात पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या होल्डिंग पॉडमध्ये गाळाचे साम्राज्य व बेसुमार खारफुटी वाढल्याने पावसाळी पाण्याचा निचरा होताना अनेक अडथळे येत असल्याने

अतिवृष्टीत शहरात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त होल्डिंग पॉडमधील गाळ न काढल्याने सिडको नागरी वसाहती आणि बाजार पेठेत पाणी शिरुन कोटयवधीचे नुकसान होत असतानाही सिडको प्रशासन त्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-१२-२०२०) :** (१), (२) व (३) नवी मुंबई शहर खाडीच्या किनारपट्टीवर बसलेले असल्याने पावसाळ्यात खाडीला येणारी भरती व पाऊस एकाच वेळी आल्यास शहरात पाणी साचू नये याकरीता सिडकोने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात बेलापूर, सानपाडा, वाशी, कोपरखैरणे व ऐरोली येथे एकूण ११ होल्डिंग पॉड तयार केलेले आहेत.

यापैकी बेलापूर सेक्टर १२, तुर्भे सेक्टर २१ व वाशी सेक्टर ८ याठिकाणी पावसाळी उदचंन केंद्र बांधलेले आहेत.

पावसाळ्यात होल्डिंग पॉडच्या ठिकाणी फ्लॅप गेट बसवून, सदर गेटच्या सहाय्याने सरासरी २५ ते ३० मी.मी. पाऊस पडत असताना भरती ओहोटीच्या वेळी होल्डिंग पॉडमध्ये साचणाऱ्या पाण्याचे नियंत्रण करण्यात येते.

दिनांक २३ सप्टेंबर, २०२० रोजी पहाटे ४.१० मी. उंचीची भरती असताना अतिवृष्टी होऊन या भागात एकूण २७८.४० मी.मी. इतका पाऊस पडले.

याठिकाणी सखल भागात २ फुट पर्यंत पाणी साचले होते. ओहोटी सुरू झाल्यानंतर साधारणत: ५ ते ६ तासात पाण्याचा निचरा झाला.

बेलापूर सेक्टर १२ येथे जलद पाण्याचा निचरा होण्याकरीता नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत नवीन पंपहाऊस बांधण्यासाठी रुपये ३३.०० कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळालेली असून, सदर काम निविदा प्रक्रियेत असल्याचे नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोरेगाव (पश्चिम), मुंबई येथील शिधावाटप दुकानामध्ये धान्याचा काळाबाजार झाल्याबाबत

**(१८) ५१८२ (१८-११-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव (पश्चिम), मुंबई येथील शिधावाटप दुकान क्रमांक २७-ग-१८९ या शिधावाटप दुकानदाराने नागरिकांच्या हक्काचे शेकडो किलो धान्य त्यांना वितरित न करता त्याचा काळाबाजार केल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुकानदाराने ३७० किलो तांदूळ आणि ५२५ किलो गहू कमी वितरित केले असून एकूण ३१ हजार ५३० रुपयांच्या धान्याचा अपहार केल्याचे निदर्शनास आल्याने उक्त प्रकाराबाबत बांगुर नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कारवाई करुन भविष्यात असे अपहार होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१७-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे. तपासणी दरम्यान ही बाब निदर्शनास आली आहे.
(२) हे खरे आहे.

(३) अधिकृत शिधावाटप दुकान क्र.२७-ग-१८९ च्या तपासणीत व गृहभेटीत अन्नसुरक्षा व केंद्र शासनाकडून देण्यात येत असलेला मोफत एकत्रित ४२४ किलो तांदूळ तसेच ५८६ किलो गव्हाचा अपहार झाल्याचे आढळून आले. सदर अपहाराच्या अनुषंगाने संबंधित रास्तभाव दुकानाविरुध्द जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ चे कलम ३, ७, ८ व राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ च्या तरतुदींचा तसेच प्राधिकारपत्रातील अटी व शर्तींचा भंग केल्याने बांगुर नगर पोलीस ठाणे, गोरेगाव येथे वि.स्था.गु.क्र. ३६/२०२०, दिनांक १८/०९/२०२० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ यांच्या दिनांक २१/०९/२०२० च्या आदेशान्वये सदर दुकान रद्द करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) किल्ल्यामध्ये सुरक्षिततेच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत

**(१९) ५२१४ (२३-११-२०२०) श्री.प्रसाद लाड, श्री.रविंद्र फाटक : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक ३२५३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) समुद्रकिनारपट्टीलगत असलेला वसई किल्ला हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ यांच्या अखत्यारीत असून सद्य:स्थितीत किल्ल्यावर एस.आय.एस.चे सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसईच्या किल्ल्यामधील सुरक्षेकरीता तसेच गैरप्रकार व अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ हे वेळोवेळी संबंधित स्थानिक प्रशासनाशी पत्रव्यवहार करते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किल्ल्याच्या काही भागात स्थानिकांच्या वास्तव्यामुळे संपूर्ण किल्ल्यावर नियंत्रण ठेवणे शक्य होत नसल्याने सद्य:स्थितीत किल्ल्यावर एस.आय.एस.चे सुरक्षारक्षक तैनात असून आणखी ५० सुरक्षारक्षक नेमण्यास मान्यता देण्याबाबत महानिर्देशक, भारतीय पुरातत्व विभाग, नवी दिल्ली यांना भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ कार्यालय, मुंबई यांनी पत्र पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सुरक्षारक्षक नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१६-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ कार्यालयाने महानिर्देशक, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, नवी दिल्ली यांना वसई किल्ला स्मारकासाठी ५० SIS सुरक्षारक्षक नियुक्त करण्याबाबत विनंती केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आयुर्वेदिक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे थकित विद्यावेतन मिळण्याबाबत

**(२०) ५२३१ (१७-११-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयुर्वेदिक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना गेल्या ४ महिन्यांपासून थकित विद्यावेतन मिळाले नसल्यामुळे त्यांनी बैठा सत्याग्रह केल्याचे दिनांक ८ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदव्युत्तर विद्यार्थी कोविड-१९ करीता काम करीत असताना पॉझीटिव्ह निघाल्यामुळे त्यांचे विद्यावेतन कपात केले गेले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे थकित विद्यावेतन उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (११-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही. मात्र, पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे थकित माहे जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर, २०२० चे विद्यावेतन ऑक्टोबर, २०२० मध्ये विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यातील शेतकरी अनुदानित बियाणांपासून वंचित राहिल्याबाबत

**(२१) ५२५२ (१८-११-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील १२ तालुक्यातील पंचायत समितीस्तरावर यावर्षीच्या खरीप हंगामाकरीता ५० टक्के अनुदानावर कमी तृणधान्य बियाणे उपलब्ध झाल्याने जिल्ह्यातील हजारो शेतकरी अनुदानित बियाणांपासून वंचित राहिल्याचे दिनांक २१ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीच्या अनुषंगाने अनुदानित बियाणांपासून शेतकऱ्यांना वंचित ठेवणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (११-१२-२०२०)** : (१) हे खरे नाही.

जिल्हा परिषदेकडील १३ वने ७ टक्के वन महसूल अनुदान योजनांतर्गत २०२०-२०२१ मध्ये खरीप हंगामात तृणधान्य बियाणेवर ५० टक्के अनुदान देणे या योजनेनुसार रूपये १५.०० लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. उपलब्ध निधीनुसार सर्व १२ तालुके मिळून ६४२.८५ क्विंटल भात बियाणे ५० टक्के अनुदानावर १९२५ शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उद्योजकांना दिलेले भूखंड विकसित न केल्याने पुन्हा एमआयडीसीने भूखंड ताब्यात घेण्याबाबत

**(२२) ५२६४ (१३-११-२०२०) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर-तारापूर औद्योगिक क्षेत्रात (जि.पालघर) एमआयडीसीने उद्योजकांना उद्योग उभारण्याकरीता दिलेल्या २०० एकरच्या भूखंडांवर ५ वर्षाहून अधिक काळ होऊन देखील भूखंड विकसित न केल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उद्योजकांना दिलेले भूखंड विकसित न केल्याने पुन्हा एमआयडीसीने भूखंड ताब्यात घेण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.उद्योग मंत्री यांस दिनांक २१ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने औद्योगिक वापर सुरु न केलेले भूखंड पुन्हा एमआयडीसीने ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२४-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे
(२) होय, हे खरे आहे.
(३) ज्या भूखंड धारकांनी विहित मुदतीत भूखंडाचा विकास केला नाही त्यांना नोटीसा पाठवून भूखंड परत महामंडळाच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## टीईटी पात्रता धारण न करणाऱ्या कार्यरत शिक्षकांचे वेतन अदा करण्याबाबत

**(२३) ५२९६ (१२-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.कपिल पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टीईटी पात्रता धारण न करणाऱ्या कार्यरत शिक्षकांचे माहे जानेवारी, २०२० पासूनचे थांबविण्यात आलेले वेतन तात्काळ अदा करण्याबाबत नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना शिक्षण उपसंचालक यांच्यामार्फत दिनांक १९ मे, २०२० रोजी व त्यापूर्वी अनेक पत्र देवून वेतन अदा करण्याबाबत विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णय, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१९ अन्वये दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ ते दिनांक ६ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत नियुक्त झालेल्या शिक्षकांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण करण्याची अट लागू नसल्याबाबतचे परिपत्रक निर्गमित करण्याची विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांचे प्रलंबित असलेले वेतन अदा करुन टीईटी परीक्षा उत्तीर्ण करण्याची अट लागू नसल्याबाबतचे परिपत्रक निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच शासन केव्हापर्यंत निर्गमित करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-१२-२०२०)** : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE) ही केंद्र शासनाची संस्था शिक्षकांची अर्हता निश्चित करण्यासाठी अधिकृत संस्था असून, त्यांनी दिनांक २३/०८/२०१० च्या अधिसूचनेने प्राथमिक शिक्षकांकरीता टीईटी उत्तीर्ण असणे ही किमान व्यावसायिक अर्हता निश्चित केली असल्यामुळे सदर अट लागू नसण्याचा प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## मिरा-भाईंदर महानगरपालिकेस बारवी धरणातून पाणी वाढवून देण्याबाबत

**(२४) ५३४२ (१३-११-२०२०) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उद्‍योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एमआयडीसीच्या मालकीच्या असलेल्या बारवी धरण (जि.ठाणे) मधुन मिरा-भाईंदर महानगरपालिकेस १०० द.ल.ली. पाणीपुरवठा करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मिरा-भाईंदर महानगरपालिकेस १०० द.ल.ली पाणी अपुरे पडत असल्याने १५० द.ल.ली. पाणी वाढवून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मा.उद्‍योग मंत्री यांस निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मिरा-भाईंदर महानगरपालिकेस बारवी धरणातून १५० द.ल.ली. पाणी वाढवून देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२४-१२-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) मा.मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९/१०/२०२० रोजी झालेल्या बैठकीत मिरा-भाईंदर महानगरपालिकेस पाण्याची निकड लक्षात घेऊन जास्तीत जास्त पाणीपुरवठा कसा करता येईल याबाबत महामंडळास कार्यवाही करण्याचे निदेश दिले आहेत.

---

## राज्यात वाघांचा मृत्यू झाल्याबाबत

**(२५) ५३४५ (१३-११-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गेल्या ६ महिन्यात १२ वाघांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वाघांचे शिकारीमुळे होणारे वाढते मृत्यू रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (१४-१२-२०२०)** : (१) राज्यात जानेवारी, २०२० ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीत ९ वाघांचा नैसर्गिकरित्या, ३ वाघांचा शेतात लावलेल्या विद्युत प्रवाहामुळे, ४ वाघांचा विषप्रयोगामुळे व एका वाघाचा मृत्यू अपघाताने झालेले आहे.
(२) अनैसर्गिकरित्या मृत्यू झालेल्या वाघाचा प्रकरणांमध्ये वन गुन्हा नोंदविण्यात आला असून त्यानुषंगाने पुढील तपास सुरु आहे.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठाण (NTCA) यांचेकडून प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सुचनांचे अनुषंगाने तसेच क्षेत्रियस्तरावर वन्यप्राण्यांच्या सुरक्षेसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- नियमित गस्तीव्दारे वन्यप्राण्यांच्या हालचालींचे सनियंत्रण करण्यात येते. याकरीता अत्याधुनिक साधनसामुग्री जसे बिनतारी संदेश यंत्रणा, कॅमेरा ट्रॅप, जीपीएस, पीडीए यांचा वापर करण्यात येतो.

- ज्या भागात वाघाचे/बिबटयाचे संघर्षाची स्थिती निर्माण होते, त्याठिकाणी जंगलात न जाण्याबाबत सावधानतेचा इशारा दर्शक पोस्टर्स लावण्यात आलेले आहेत व आवश्यक ठिकाणी जलद प्रतिसाद चमु गठीत करण्यात आलेली आहे.
- वन्यप्राण्यांसाठी जंगलात पाण्याचे स्त्रोत (पाणवठे, सिमेंट प्लग बंधारे, वनतलाव इ.) निर्माण करण्यात येतात.
- ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे व मानव वन्यजीव संघर्षाला आळा बसावा म्हणून डॉ.शामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंतर्गत गावातील कुटूंबाना एलपीजी गॅस पुरवठा करण्यात येत आहे.
- महत्वाच्या ठिकाणी तपासणी नाके, संरक्षण कुटया उभारण्यात आलेले असून वन कर्मचारी रात्र-दिवस गस्त करतात. तसेच श्वानपथक निर्माण करुन त्याचा उपयोग करण्यात येतो.
- विद्‌युत प्रवाहाव्दारे होणाऱ्या शिकारीच्या घटनांवर सनियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने विद्‌युत वितरण कंपनीच्या स्थानिक अधिकाऱ्यांना संयुक्त सभेत पाचारण करण्यात येते. तसेच शेतालगत विद्‌युत प्रवाह सोडल्यामुळे किंवा विद्‌युत प्रवाहाच्या सहाय्याने वन्य प्राण्यांची शिकार करणाऱ्यांवर वन विभाग व विद्‌युत विभागाचे कायदयानुसार दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल याबाबत गावागावात सभा घेऊन लोकांमध्ये जनजागृती करण्यात येते.
- वन्यप्राणी शिकार अथवा वनगुन्हयासंबधी माहिती जलद प्राप्त होण्यासाठी वन विभागाची हेल्प लाईन टोल फ्रि क्रमांक १९२६ कार्यान्वित करण्यात आली आहे.
- प्रत्येक पाणवठ्याची वनमजुर/वनरक्षकांमार्फत पाणवठ्यातील पाण्याची व पाणवठा सभोवताल परिसराची नियमित तपासणी करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

**(२६) ५३६६ (१८-११-२०२०) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना विनाअट व विनाविलंब शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांनी अमरावती विभागात आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या मागण्या गत अनेक वर्षांपासून शासनस्तरावर प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (२२-१२-२०२०)** : (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) पदवीधर अंशकालीन उमेदवारांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी शासनस्तरावरुन वेळोवेळी दखल घेवून अनेक प्रकारच्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत तसेच करण्यात येत आहे. यापैकी काही ठळक उपाययोजना खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करुन राबविण्यात येत आहे.

१. शासन परिपत्रक, क्र.कौविउ-२०१८/प्र.क्र.५४/(भाग-३)/रोस्वरो-१, दिनांक ०२/०३/२०२० अन्वये बाहययंत्रणेकडून (आऊट सोर्सिंगव्दारे) कामे करुन घेण्याबाबत पदवीधर अंशकालीन उमेदवारांना सूट देवून वैयक्तिकरित्या प्राधान्याने नेमणूक देण्याबाबत.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-१११९/प्र.क्र.८९/१६-अ, दिनांक २८ मे २०१९ अन्वये पदवीधर/पदवीधारक अंशकालीन उमेदवारांसाठीचे १० टक्के समांतर आरक्षण आणि कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे याची राज्यात काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत.

३. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-५०१८/प्र.क्र.८३३/आस्था-४, दिनांक १७/०६/२०२० अन्वये पदवीधर अंशकालीन उमेदवारांना विशेष बाब म्हणून कंत्राटी तत्वावर नोकरी देण्याबाबत.

४. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२४/२०/आ.पु.क., दिनांक ३०/०९/२०२० अन्वये सेवा बाह्ययंत्रणेव्दारे संस्था/ठेकेदारामार्फत घेण्यापूर्वी अशा सेवा सर्वप्रथम पदवीधर अंशकालीन उमेदवारांमधून घेण्यात याव्यात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबई येथे परप्रांतियांकडून अवैधरित्या मासे विक्री केल्याबाबत

**(२७) ५४३८ (२०-११-२०२०) श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत पारंपारिक कोळी मच्छिमार महिला अधिकृत मार्केटमध्ये मासे विक्री करीत असताना परप्रांतियांकडून अवैधरित्या मासे विक्री केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेने मच्छिमार महिलांकरीता अधिकृत मच्छी मार्केट व्यतिरिक्त खाजगी मार्केटमध्ये मासे विक्री करण्याची परवानगी दिली असून त्याव्यतिरिक्त जर कोणी व्यक्ती रस्त्यावर बसून मासे विक्री करीत असल्यास किंवा घरोघरी जाऊन विक्री करीत असल्यास त्यावर महाराष्ट्र मुन्सिपल कॉर्पोरेशन, १९४९ च्या कलम ३८१ नुसार कारवाई करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुसार सदर अनधिकृत मासे विकणाऱ्या लोकांवर नवी मुंबई महानगरपालिकेने आपल्या ऐरोली, घणसोली वॉर्ड अधिकाऱ्यांमार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील घणसोली व ऐरोली विभागात अवैधरित्या मासे विक्री करणाऱ्या एकूण १२४ विक्रेत्यांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ३८१अ अन्वये वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली आहे.

जर कोणी व्यक्ती रस्त्यावर बसून किंवा घरोघरी जाऊन मासे विक्री करीत असल्याचे आढळून आल्यास अशा अनधिकृत मासे विक्रेत्यांवर नियमित कारवाई करण्यात येणार असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर प्रत्येक जिल्हा व तालुक्यांच्या ठिकाणी विद्यालये सुरू करण्याबाबत

**(२८) ५४७९ (१२-११-२०२०) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण व शहरी भागातील हुशार विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाने सुरू केलेल्या नवोदय विद्यालयाचा अनेक गरीब विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यावेळी लोकसंख्या फारच कमी असल्याने वाढती लोकसंख्या व विद्यार्थ्यांची गरज पाहता नवोदयच्या धर्तीवर राज्य शासनाने अशी विद्यालये प्रत्येक जिल्हा व तालुकांच्या ठिकाणी सुरू करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर प्रत्येक जिल्हा व तालुकांच्या ठिकाणी अशी विद्यालय सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२८-१२-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे,
(३) सदर बाब शासनस्तरावर तपासण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सूर्या डावा व उजवा तीर कालव्यांशेजारील अतिक्रमणे दूर करण्याबाबत

**(२९) ५५५२ (२३-११-२०२०) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सूर्या प्रकल्पातील (जि.पालघर) डावा व उजवा तीर कालवा परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे माहे सप्टेंबर २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सूर्या डावा व उजवा तीर कालव्याशेजारील अतिक्रमणे दूर करुन कालव्यांची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२३-१२-२०२०) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

क्षेत्रिय पाहणीत पालघर जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पांतर्गत उजवा तीर कालव्यावरील पालघर शाखा क्र.२ च्या थेट लघुपाट क्र. २, ३ व ९ तसेच डावा तीर कालव्यावरील थेट लघुपाट क्र. १, ७, १३, १८, १९ वर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे.

उपरोक्त अतिक्रमणांच्या अनुषंगाने महाराष्ट्र सिंचन कायदा, १९७६ मधील कलम १९ अन्वये संबंधितांविरुध्द कायदेशीर कारवाई सुरु करण्यात आली आहे.

कालव्याच्या देखभाल दुरुस्तीच्या अनुषंगाने, सूर्या प्रकल्पासाठी कोकण पाटबंधारे विकास महामंडळाकडे जमा असलेल्या सिंचन पुनर्स्थापना निधीतून सूर्या उजवा तीर कालवा व डावा तीर कालव्याच्या दुरुस्तीसाठी रुपये २६.५० कोटीची तरतूद सन २०२०-२०२१ करीता मंजूर असून सदर कामांची ई-निविदा कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सदरची कामे हाती घेण्यात येतील.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सारथी या संस्थेकडून विद्यार्थ्यांना मानधन मिळण्याबाबत

**(३०) ५५६२ (२३-११-२०२०) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २ ला दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सारथीसाठी (राजर्षी शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था) ८ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सारथीमार्फत निवडलेल्या स्पर्धा परिक्षेच्या विद्यार्थ्यांना मानधन मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना मानधन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२२-१२-२०२०)** : (१) "सारथी" पुणे करीता आर्थिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये शासनाने रुपये ७.९४ कोटी व रुपये ११.४० कोटी असा एकूण रुपये १९.३४ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.

(२) "सारथी" पुणे मार्फत स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना आर्थिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये रुपये ६६,७८,०००/- इतके मानधन वितरित करण्यात आलेले आहे.

(३) व (४) अनुज्ञेय विद्यावेतन देण्यात आले आहे. त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियमानुसार शाळांनी घेतलेले जास्तीचे शुल्क विद्यार्थ्यांना परत करण्याबाबत

**(३१) ५५६६ (१२-११-२०२०) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ नुसार सी.बी.एस.ई. शाळांची तपासणी करून सादर केलेल्या अहवालानुसार शाळांनी घेतलेले जास्तीचे शुल्क वसूल करून विद्यार्थ्यांना परत करण्याबाबतची

कार्यवाही करणे तसेच शाळांविरूध्द दंडात्मक कारवाई करणेबाबत नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी निवेदन पाठवून शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक, जिल्हा परिषद, नागपूर यांनी जादा शुल्क घेणाऱ्या शाळांच्या संयुक्त तपासणी अहवालानुसार कारवाई करण्याची मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षणाधिकाऱ्यांचे संयुक्त तपासणी अहवाल शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग यांनी शासनास सादर न करता प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जास्तीचे शुल्क विद्यार्थ्यांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२८-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर विषय न्यायप्रविष्ट असून मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी फी संदर्भात शाळांविरुध्द कोणतीही कारवाई करण्यास अंतरीम स्थगिती आदेश दिले आहेत.

---

## राज्यातील रात्रशाळांना पूर्णवेळेचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्याबाबत

**(३२) ५५७० (१२-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने रात्र शाळांमधील कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ वेतनश्रेणी लागू करण्याबाबत मागील ३ वर्षापूर्वीच निर्णय घेतला असून पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाखेरीज राज्यात अन्य कुठेही या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत नसल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत १२० रात्रशाळा असताना त्यामधील कर्मचाऱ्यांना मागील ३ वर्षापासून वेळोवेळी मागणी करुनही वेतनश्रेणी लागू करण्यात न आल्याने त्याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्यावतीने मा.शालेय शिक्षण मंत्री, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याशी मागील ३ वर्षापासून सतत संपर्क साधून व निवेदने देऊनही शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रात्रशाळेतील फक्त एकाच ठिकाणी काम करणाऱ्यांना पूर्णवेळ वेतनश्रेणी, निवृत्ती, निवृत्तीवेतन योजना व इतर सेवाशर्तीचा लाभ देण्याची मागणी सन २००५ पासून करण्यात येत असून रात्रशाळेतील विविध समस्यांसंदर्भात माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये शासनासोबत झालेल्या बैठकीत सर्व मुद्यांवर चर्चा करण्यात येवून रात्र शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवा शर्तीबाबत शासनाने दिनांक १७ मे, २०१७ रोजी धोरणात्मक निर्णय घेवून शासन निर्णय निर्गमित करण्यात आला, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक १७ मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयाला मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. १५४१/२०१७ व ५९८९/२०१७ मध्ये दिलेल्या आदेशाव्दारे वैध घोषित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त शासन निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली नसल्यामुळे रात्रशाळांना पूर्णवेळ दर्जा न मिळाल्याने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यात नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता कार्यवाही करुन शासन निर्णयाची वेळीच अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू शासन आदेश केव्हापर्यंत निर्गमित करण्यात येणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-१२-२०२०) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) दिनांक १७/०५/२०१७ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी योग्य रितीने होत नसल्याच्या तक्रारी दूर करुन रात्रशाळांना भेडसावत असलेल्या समस्याबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी तसेच दिनांक १७/०५/२०१७ रोजीच्या शासन

निर्णयाची अंमलबजावणी योग्य रितीने व्हावी. यासाठी दिनांक २५/०७/२०१९ च्या शासन निर्णयान्वये अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे. सदर अभ्यास गटाने सादर केलेल्या शिफारशी महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतूदी व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. ५९८९/२०१७ प्रकरणी दिनांक १६/०६/२०१७ रोजी दिलेले आदेश विचारात घेऊन यासंदर्भातील प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

---

## राज्यात दूध उत्पादक शेतकऱ्यांना दरवाढ देण्याबाबत

**(३३) ५६१८ (१८-११-२०२०) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत : तारांकित प्रश्न क्रमांक १३५८ ला दिनांक ५ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दूधाचे दर कमी झाल्याने दूध उत्पादक शेतकरी अडचणीत आले असून राज्यातील विविध दूध उत्पादक संघटनानी आंदोलने करुन दुधाला प्रति लिटर रुपये ३०/- दर तर प्रति लिटर रुपये १०/- अनुदान देण्याबाबत शासनाकडे मागण्या केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) राज्यात शेतकऱ्यांकडून रुपये १८/- प्रति लिटर दरानी खरेदी होणारे दूध रुपये ४८ प्रति लिटर दराने ग्राहकांना विकत घ्यावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील दूध संघांतर्गत असलेल्या विसंगतीचा फायदा इतर राज्यातील संघाना होत असून हे संघ सुमारे ३३ लाख लिटर दुधाची विक्री किरकोळ स्वरुपात पिशव्याच्या माध्यमातून राज्यात करीत राज्यातील बाजार पेठेतील ५० टक्के दूध विक्रीचा वाटा घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात सातत्याने दूध खरेदी दरात बदल होत असल्याने ग्राहकांना रुपये ४६ ते ४८ दराने दूध घ्यावे लागते, तसेच महानंद दूध संघाने मागील चार महिन्याच्या काळात प्रति लिटर रुपये २५ दर दिला तर खाजगी दूध संघाने मात्र शेतकऱ्यांना रुपये २० दर दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दूधाच्या दर विसंगतीबाबत निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दूध दरवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (१६-१२-२०२०) :** (१) होय, अशा प्रकारच्या मागण्या सातत्याने शासनाकडे प्राप्त होत असतात.

(२) हे खरे नाही.

३.५ फॅट व ८.५ एसएनएफ या निर्धारित गुणप्रतीला शासनातर्फे संकलित करण्यात आलेल्या गाय दूधाला प्रति लिटर रुपये २५/- खरेदी दर दिला जात आहे. सहकार व खाजगी क्षेत्रातर्फे संकलित करण्यात येणाऱ्या दूधाला प्रतिलिटर २०/- ते २५/- रुपये दर अदा केला जात आहे. तसेच शासनातर्फे विक्री करण्यात येणाऱ्या गाय दूधाला ३८/- रुपये प्रतिलिटर या दराप्रमाणे विक्री केली जात आहे. तसेच सहकार व खाजगी क्षेत्रातर्फे विक्री करण्यात येणाऱ्या गाय दूधाला प्रति लिटर ४६/- ते ४८/- रुपये दराने विक्री केली जात आहे.

(३) होय,

राज्यात एकूण संकलित दूधापैकी माहे ऑक्टोबर, २०२० च्या आकडेवारीनुसार एकूण ७६.११ लाख लिटर प्रतिदिन पिशवीबंद दूधाची विक्री होत आहे. यापैकी इतर राज्यातील संघांमार्फत मुंबई, पुणे, नागपूर इ. प्रमुख शहरांमध्ये १५ लाख लिटर प्रति दिन पिशवीबंद दूधाची विक्री होत आहे.

(४) होय.

(५) राज्यातील दुग्धव्यवसाय क्षेत्रात शासनाचा वाटा केवळ १% इतकाच आहे. उर्वरित दुग्धव्यवसाय हा सहकार व खाजगी क्षेत्राकडून केला जात आहे. खाजगी व सहकार क्षेत्रामार्फत दूध खरेदी-विक्रीचे दर त्यांचेमार्फत परस्पर निश्चित करण्यात येतात. शासनामार्फत केवळ शासकीय दूध योजनेंतर्गत संकलित होणाऱ्या दूधाचे दूध खरेदी व विक्री दर निश्चित करण्यात येतात.

असे असले तरी, शासनाने शासकीय दूध योजनेकरीता निश्चित केलेल्या दूध खरेदीच्या दराप्रमाणे दूध उत्पादकांना दर द्यावा असे निदेश महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७९ अ अन्वये दिनांक १०/०७/२०१५ रोजी निर्गमित केले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या वित्त विभागांतर्गत कनिष्ठ लेखाधिकारी हे पद गैरमार्गाने भरल्याबाबत

**(३४) ५७२४ (१४-११-२०२०) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या वित्त विभागांतर्गत कनिष्ठ लेखाधिकारी हे पद बिंदू नामावली डावलून गैरमार्गाने जिल्हा निवड समितीने भरल्याचे सन २०१४ मध्ये सहाय्यक आयुक्तांच्या चौकशीत निष्पन्न झाल्याने विभागीय आयुक्तांनी या प्रकरणातील संबंधित २१ दोषी अधिकाऱ्यांविरुध्द व कर्मचाऱ्यांविरुध्द दोषारोप १ ते ४ सादर करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशास दोन वर्षे होऊनही मुख्य कार्यकारी अधिकारी, उस्मानाबाद यांनी दोषारोप १ ते ४ पाठवले नसून या प्रकरणी कोणतीच कारवाई केली नसल्याने तत्कालीन जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी निवड समिती सदस्य यांच्यासह २१ अधिकाऱ्यांविरुध्द आनंदनगर पोलीस स्टेशनला फिर्याद दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतर मागासवर्गीय जागेसाठी रिक्त असलेल्या बिंदू नामावलीप्रमाणे पद भरणे आवश्यक असताना गैरमार्गाने भटकी जमात (ब) मधून पद भरणारी निवड समिती व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१७-१२-२०२०) :** (१) होय.

तत्कालीन संबंधित अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यासाठी दोषारोपाचा प्रस्ताव विभागीय उपआयुक्त (आस्थापना), औरंगाबाद यांच्याकडून मागविण्यात आला होता.

(२) होय.

(३) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील रात्र कनिष्ठ महाविद्यालयामधील शिक्षकांना वेतन अदा करण्याबाबत

**(३५) ५७३२ (१२-११-२०२०) श्री.संजय दौंड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रात्र कनिष्ठ महाविद्यालयामधील शिक्षकांना माहे डिसेंबर, २०१९ पर्यंत ऑफलाईन पध्दतीने वेतन अदा करण्यात येत होते, परंतु राज्य शिक्षण विभागाची ऑनलाईन प्रक्रिया माहे डिसेंबर, २०१९ मध्ये पूर्ण होऊनही रात्र कनिष्ठ महाविद्यालयामधील शिक्षकांची ऑनलाईन नोंदणी करण्यात आली नसल्यामुळे मागील आठ महिन्यांपासून (माहे जानेवारी, २०२०) वेतनच दिले जात नसल्याचे दिनांक २२ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील सात-आठ महिने वेतनापासून वंचित राहिलेल्या या शिक्षकांना वेतन देण्याची तात्काळ सोय करण्याबाबत प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेने मा.शालेय शिक्षण मंत्री, मा.शालेय शिक्षण राज्यमंत्री, प्रधान सचिव, शालेय शिक्षण व उपसंचालक शिक्षण यांना माहे जुलै, २०२० मध्ये निवेदने सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (१७-१२-२०२०) :** (१) व (२) प्रस्तुत प्रकरणी दिनांक १८/११/२०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर, २०२० पर्यंतचे नियमित वेतन ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार रात्र कनिष्ठ महाविद्यालयातील माहे नोव्हेंबर, २०२० पर्यंतचे वेतन ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयातील खेड, दापोली व मंडणगड येथील लघु पाटबंधाऱ्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(३६) ५७३५ (२३-११-२०२०) श्री.रामदास कदम :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील खेड, दापोली व मंडणगड येथील १३ लघु पाटबंधाऱ्यांची कामे गत २५ वर्षांपासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लघु पाटबंधाऱ्यांच्या कामासाठी शासनाने रुपये १०० कोटी निधी उपलब्ध करुन दिला असूनही संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे सदर निधी खर्च न करता १३ लघु पाटबंधाऱ्यांची कामे अपूर्ण राहिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर लघु पाटबंधाऱ्यांच्या कामासाठी निधी खर्च न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२३-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दापोली मतदार संघामध्ये १३ लघु पाटबंधारे प्रकल्पांचा समावेश आहे. सद्य:स्थितीत कोंडीवली, पणदेरी व पंचनदी हे ३ प्रकल्प पूर्ण असून, पाणीसाठा व सिंचन क्षमता निर्मिती पूर्ण झाली आहे व रत्नागिरी पाटबंधारे विभागामार्फत सिंचन व्यवस्थापन चालू आहे. उर्वरीत ४ प्रकल्प बांधकामाधीन असून ६ अवशिष्ट प्रकल्प आहेत.

४ बांधकामाधीन प्रकल्पांपैकी न्यूमांडवे प्रकल्प वगळता इतर ३ पोयनार, शेलारवाडी व तळवट या प्रकल्पांची धरण व सांडवा कामे सुप्रमा अभावी संस्थगित आहेत. न्यूमांडवे प्रकल्पाची सविस्तर संकल्पने माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये प्राप्त झाली असून उपलब्ध अनुदानामध्ये कामे प्रगतीपथावर आहेत.

पिंपळवाडी, तिडे, भोळवली, शिरसाडी, आवाशी व टांगर या ६ अवशिष्ट प्रकल्पांची धरण कामे १००% पूर्ण आहेत व कालवा कामे ९०% पूर्ण आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार सुप्रमा मर्यादेत बांधकामाधीन व अवशिष्ट प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

सुप्रमा मंजूरी अभावी निधी उपलब्ध असतानाही प्रकल्पावर खर्च होऊ शकला नाही. मागील ५ (सन २०१५-२०१६ ते २०१९-२०२०) वर्षात अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार उपलब्ध झालेला निधी व झालेला खर्च यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे. :-

| **अ. क्र.** | **प्रकल्पाचे नाव** | **उपलब्ध निधी (रुपये लक्ष)** | **झालेला खर्च (रुपये लक्ष)** |
|---|---|---|---|
| १ | कोंडीवली | १११.११ | १११.११ |
| २ | पणदेरी | ४०.०३ | ४०.०३ |
| ३ | पंचनदी | ७२.५४ | ७२.५४ |
| ४ | न्यूमांडवे | १४००.०० | १०१४.१६ |
| ५ | तळवट | १५०३.०० | ३७८.४२ |
| ६ | शेलारवाडी | १३०३.०० | ९२९.०८ |
| ७ | पोयनार | २३००.०० | ९९१.७९ |
| ८ | पिंपळवाडी | ५१०.४० | ५१०.४० |
| ९ | तिडे | ४२००.०० | ३३१६.०८ |
| १० | भोळवली | १९९.१४ | १९९.१४ |
| ११ | आवाशी | २९३.३३ | २९३.३३ |
| १२ | शिरसाडी | १२१.९० | १२१.९० |
| १३ | टांगर | १४९.३१ | १४९.३१ |
| | **एकूण** | **१२२०४.३५** | **८१२७.८८** |

न्यूमांडवे प्रकल्पाचे मुख्य विमोचक, सांडवा व पुच्छ कालव्याचे सविस्तर संकल्पन माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये प्राप्त झाले असून तत्पूर्वी संकल्पनाअभावी कामावर खर्च करता आलेला नाही. तसेच उर्वरीत ३ पोयनार, शेलारवाडी व तळवट या बांधकामाधीन प्रकल्पांवर सु.प्र.मा.पेक्षा जास्त खर्च झालेला असल्याने खर्चावर बंधने आहेत. सदर प्रकल्पांवर फक्त भूसंपादन, पुनर्वसन यावर खर्च करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुसूचित जमातीसाठी विशेष भरती मोहिम मधील पात्र शिक्षण सेवकांना नियुक्त्या देण्याबाबत

**(३७) ५८०३ (२३-११-२०२०) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद, बीड व जिल्हा परिषद, औरंगाबाद अंतर्गत अनुसूचित जमातीसाठी विशेष भरती मोहिम २०२० अंतर्गत “शिक्षण सेवक” या पदासाठी उमेदवारांच्या छाननी तपासणी सुची माहे जानेवारी, २०२० मध्ये लावून, लगेच आक्षेप स्वीकारण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी प्रवर्गातील अनुसूचित जमातीची जात प्रमाणपत्र अवैध झालेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करुन त्यांच्या रिक्त झालेल्या जागी वरील भरती करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा परिषद, बीड व जिल्हा परिषद, औरंगाबाद येथील निवड झालेल्या पात्र उमेदवारांना नियुक्त्या देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२३-१२-२०२०) :** (१) होय.
(२) होय.

(३) जिल्हा परिषद, बीड अंतर्गत आदिवासी प्रवर्गातील अनुसूचित जमातीची जात प्रमाणपत्र अवैध झालेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग केल्यामुळे त्यांनी मा.उच्च न्यायलय, खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.१९६३/२०२०, १९१५/२०२०, १४८५/२०२०, १८३०/२०२० व १६७२/२०२० दाखल केल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने ५ शिक्षकांना अधिसंख्य पदावर वर्ग केल्याच्या आदेशास अंतरिम स्थगिती दिली असल्याने नियुक्ती आदेश देण्यात आलेले नाहीत. तथापि, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहेत.

तसेच जिल्हा परिषद, औरंगाबाद अंतर्गत अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या १४ रिक्त जागेवर भरती करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येऊन अर्ज मागविण्यात आले. अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आली. प्रत्यक्ष आक्षेपानुसार यादी अंतिम करण्यापूर्वीच दिनांक २४ मार्च, २०२० पासून लॉकडाऊन लागल्याने तसेच वित्त विभागाने शासन निर्णय, दिनांक ०४ मे, २०२० अन्वये कोणत्याही प्रकारच्या पदभरतीवर निर्बंध घातल्याने सदरची पदभरती प्रक्रिया सद्य:स्थितीत स्थगित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोरफडी (ता.जि.बीड) स्वस्त धान्य दुकानदारावर कारवाई करण्याबाबत

**(३८) ५८४९ (१२-११-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरफडी (ता.जि.बीड) स्वस्त धान्य दुकानदाराकडून धान्य वाटप केले जात नसल्याकारणाने शिधापत्रिकाधारकांनी जिल्हा पुरवठा अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित स्वस्त धान्य दुकानदाराकडे पुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचारी दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप संबंधित ग्रामस्थ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुरवठा अधिकाऱ्यांनी स्वस्त धान्य दुकानदाराकडे दुर्लक्ष केले असून दुकानदार चौकशीत दोषी आढळल्यानंतरही दुसरे दुकान गावातील संबंधित व्यक्तीस देण्याचा प्रयत्न करीत असल्याची तक्रारही गावकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१७-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) हे खरे नाही. तथापि, मौजे बोरफडी (ता.जि.बीड) येथील नविन स्वस्त धान्य दुकान गुणांकन प्रक्रियेव्दारे जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांच्या आदेशान्वये मोहिनीराज महिला बचत गट यांच्या नावे मंजूर करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या कल्याण विभागातील सहायक नगर रचनाकार व नगर रचनाकार यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३९) ५८८५ (२०-११-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत लॉकडॉऊन काळात कॅटेनमेन्ट झोन आणि रेड झोनमध्ये कोणत्याही प्रकारच्या बांधकामास मंजुरी देऊ नये असे मा.मुख्यमंत्र्यांचे आदेश असतानाही सहाय्यक नगर रचनाकार श्री.सुनील पाटील तसेच कल्याण विभागाचे नगर रचनाकार श्री.रघुवीर शेळके यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांतर्गत बांधकामांना मंजुरी दिल्याची बाब स्थानिक नागरिक श्री.मनोज कुलकर्णी यांनी दिनांक ३ जून, २०२० रोजी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.रघुवीर शेळके, प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) येथे कार्यरत असताना शासनाच्या नियमाचे उल्लंघन करून स्वतःच्या मुलाला पदाचा फायदा व्हावा व स्वतःला आर्थिक लाभ व्हावा याकरीता अर्थपूर्ण व्यवहार करून पदावनत करून नगर रचनाकार या पदावर बदली करून घेवून शासनाचे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ कलम १६ (१) अन्वये "कोणताही शासकीय कर्मचारी शासनाची पूर्वमंजुरी मिळाल्याशिवाय प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यापारात किंवा धंद्यात गुंतता कामा नये, किंवा दुसरी कोणतीही स्वीकारता कामा नये" व कलम १६(२) अन्वये "प्रत्येक शासकीय कर्मचारी, त्याच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती एखाद्या व्यापारात किंवा व्यवसायात गुंतलेली असेल किंवा एखाद्या विमा एजेन्सीची किंवा कमिशन एजन्सीची मालक असेल किंवा व्यवस्था पाहत असेल, तर त्याने शासनास कळवले पाहिजे," ह्या नियमाचा भंग करुन नगर रचनाकार श्री.शेळके यांनी त्याचे चिरंजीव श्री.राहुल रघुवीर शेळके यांचेमार्फत कल्याण विभागांतर्गत सुरु असलेल्या बांधकाम व्यवसायात ते आपल्या पदाचा वापर करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून महानगरपालिकांतर्गत बांधकामांना परवानगी दिल्या प्रकरणी शासनाने सर्व कामाची विभागीय सखोल चौकशी करून सर्व बांधकाम परवानगी विनाविलंब रद्द करुन उपरोक्त बांधकामांना जबाबदार असणाऱ्या सहाय्यक नगर रचनाकार श्री.सुनील पाटील यांची विभागीय चौकशी करून त्यांना महानगरपालिका सेवेतून तात्काळ बडतर्फ करण्याबाबत तसेच श्री.रघुवीर शेळके, नगर रचनाकार यांनी शासनाच्या नियमाच्या केलेल्या उल्लंघनाप्रकरणी त्यांची सखोल चौकशी करून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ नुसार बडतर्फ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-१२-२०२०) :** (१) अशा आशयाचे निवेदन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला प्राप्त झाले ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) श्री.मनोज कुलकर्णी, स्थानिक नागरिक यांनी अशा प्रकारची तक्रार आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे केली आहे.

आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी श्री.रघुवीर शेळके, नगर रचनाकार यांचा दिनांक ०९/०६/२०२० च्या कारणे दाखवा नोटीशी अन्वये खुलासा मागितला आहे.

श्री.शेळके यांनी दिनांक २६/०६/२०२० रोजी त्यांचा खुलासा सादर केला असून त्यावर नियमानुसार कार्यवाही सुरू असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महापालिकेच्या मुख्यालयात झाडांना हानी पोहचविण्यात आल्याबाबत

**(४०) ५८९७ (२०-११-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महापालिकेच्या मुख्यालयात झाडांना खिळे ठोकून त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून केबलची वायरही टाकण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पर्यावरणाचा ऱ्हास केल्याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्यालयाच्या आवारातील बॉटलपामच्या झाडावर सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावलेले आढळून आले होते.

सदर कॅमेरे महानगरपालिकेकडून काढण्यात आलेली आहेत.

सद्य:स्थितीत मुख्यालयातील झाड सुस्थितीत असल्याचे तसेच अशा प्रकारची यंत्रणा लावण्यात येणार नाही, याची संपूर्ण दक्षता व खबरदारी घेण्यात येईल असे मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मिरा रोड (जि.ठाणे) येथे उपायुक्तांच्या आदेशाने बेकायदेशीररित्या कर आकारणी होत असल्याबाबत

**(४१) ५८९८ (२०-११-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा रोड (जि.ठाणे) येथील कांदळवन, पाणथळ व सीआरझेड-१ मधील बेकायदेशीर बांधकामाकरीता शासनाने कर आकारणी केल्यामुळे शहरातील बेकायदेशीर बांधकामे कायदेशीर होवू नये याकरीता बेकायदेशीर बांधकामांना कर आकारणी करु नये तसेच शासकीय जमिनीवरील बेकायदेशीर बांधकामाबाबत विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेऊनच कर आकारणी करावी असा निर्णय महापालिकेने सन २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महापालिकेने निर्णय घेतलेला असतानाही माहे डिसेंबर, २०१९ मध्ये उपायुक्तांच्या आदेशाने कर आकारणी केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार जबाबदार व्यक्ती विरोधात शासनस्तरावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-१२-२०२०)** : (१), (२) व (३) मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीने शासकीय जागेवरील मालमत्ता या अस्तित्वात असेपर्यंतच्या कालावधीकरीता कर आकारणी करणेबाबत तत्कालीन आयुक्त यांचे मान्यतेने तत्कालीन उपआयुक्त (कर) यांनी दिनांक २७/१२/२०१८ अन्वये कर आकारणी करण्याबाबत आदेश पारीत केलेले आहेत.

सदर आदेशामध्ये शासकीय जमिनीबाबत संबंधित विभागाचे ना-हरकत घेऊन कर आकारणी करणे तसेच कांदळवन, पाणथळ व सीआरझेड-१ या क्षेत्रातील मालमत्ता कर आकारणी करण्यात येऊ नये असे नमूद केलेले आहे.

दिनांक २७/१२/२०१८ रोजीच्या आदेशामध्ये सुधारणा करून शासकीय जमिनीवरील मालमत्तांना कर आकारणी करतांना सदर झोपडी ही दिनांक ०१/०१/२०११ पुर्वीची असल्याचे प्राप्त पुरावे विचारात घेऊन कर आकारणी करण्याबाबत दिनांक १४/०२/२०१९ अन्वये सुधारित आदेश पारीत केलेले आहेत.

सदर आदेशास अनुसरून प्रभाग स्तरावर कर आकारणी करण्यात येत असल्याचे मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ग्रामपंचायतीची मासिक सभा व ग्रामसभेचे इतिवृत्त वेळेत सादर करण्याबाबत

**(४२) ६०३५ (२३-११-२०२०) श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक, क्र.व्हीपीएम-२६८७/८३२/३०८०/२१, दिनांक २९ जून, १९८८ नुसार ग्रामपंचायतीची मासिक सभा व ग्रामसभेचे इतिवृत्त ग्रामसेवक यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे वेळेत जमा करणे आवश्यक असल्याचे तसेच परिपत्रक क्र. ग्रापक-२००५/प्र.क्र.१४/पंरा-५, दिनांक २२ मार्च, २००५ नुसार कॅलेंडर वर्षात ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या उपमुख्य कार्यकारी (ग्रापं) यांनी दोन तर गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी तीन सभा घेणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद, पालघर व त्या अंतर्गत पंचायत समित्या यांनी अशा सभा घेत नसल्याचे निदर्शनास आले असून काही ग्रामपंचायती व लेखा ग्रामपंचायती किमान वेतनापेक्षाही कमी वेतन देत असल्याचे निदर्शनास आले तसेच लेखा परीक्षण अहवालात सेवापुस्तिका न भरणे, भविष्य निर्वाह निधी न भरणे, याबाबत कोणतेही आक्षेप घेतले जात नसून लेखा परीक्षण अहवाल मुदतीत दिले जात नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालघर जिल्ह्यात ग्रामपंचायतीची मासिक सभा व ग्रामसभेचे इतिवृत्त वेळेत सादर केले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने ग्रामपंचायतीची मासिक सभा व ग्रामसभेचे इतिवृत्त वेळेत सादर न करणाऱ्या ग्रामसेवक व ग्रामपंचायत कर्मचारी यांचेवर कारवाई करुन लेखा परीक्षण अहवाल मुदतीत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२३-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) संबंधित ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भातील विमानतळांचे काम बंद असल्याबाबत

**(४३) ६२५८ (२३-११-२०२०) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विकास निधी कोविड-१९ वरील उपाययोजनासाठी वापर करावयाचा असल्याने विदर्भातील विमानतळाचे काम बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, चंद्रपूर जिल्हयातील राजूरा येथे उभारण्यात येत असलेले विमानतळ, अमरावती विमानतळ अशा विदर्भातील इतर विमानतळांना मंजूर करण्यात आलेला निधी न मिळाल्याने कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्व विमानतळांच्या कामांच्याबाबतीत शासनाने निधी दिला नसताना पश्चिम महाराष्ट्रातील विमानतळांना कोविड-१९ च्या काळात निधी देण्यात आला असल्याने याबाबत वित्त विभागाचे धोरण काय आहे,
(४) असल्यास, कोविड-१९ वरील उपाययोजनांसाठी निधी वापरत असताना राज्यातील सर्व विमानतळांच्या विकास कामांसाठी मंजूर करण्यात आलेला निधी समान पध्दतीने देण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने राज्यातील सर्व विकासकामांसाठी समान निधी वाटप करण्याबाबत तसेच कर्मचाऱ्यांच्या वेतनात लावलेली कपात उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उध्दव ठाकरे (२२-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) राज्यातील विमानतळांना त्यांच्या गरजेप्रमाणे निधी उपलब्ध करुन दिला जातो.
(४) आवश्यकतेनुसार तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार निधी वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) उक्त प्रकरणी चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही. विकासकामांसाठी समान निधी वाटप करण्याबाबतचे धोरण हे कोविड-१९ या साथरोगाच्या पार्श्वभूमीवर तपासले असता, शासनाने प्राधान्यक्रम बदलल्याने त्यानुषंगाने निधी वितरणाबाबत टप्प्याटप्प्याने सूचना निर्गमित करण्यात येत आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या वेतनात कपात करण्यासंदर्भात कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या खात्यांची गोपनीयता धोक्यात आल्याबाबत

**(४४) ६२७५ (१४-१२-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) sevaarth.mahakosh.gov.in या वेबसाईटवर गेल्यावर यूजरनेम व पासवर्ड टाकल्यानंतर सबमिटवर क्लिक केले म्हणजे ट्रेजरी ऑफिस, बँकेचे नाव, खातेदाराचे नाव, कोणत्या दिनांकापासून कोणत्या दिनांकापर्यंतचे डिटेल्स हवे आहेत ही माहिती भरली की बँक खात्याचे डिटेल्स तर येतातच शिवाय बँक खाते क्रमांक देखील येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संगणकाव्दारे वैयक्तिक माहिती प्राप्त करण्यासाठी जो वापरकर्ता असतो त्याची ओळख पटल्याशिवाय त्याला ती माहिती प्राप्त होऊ नये यासाठी ऑथेंटिकेशन प्रोटोकॉल म्हणून अत्यंत महत्त्वाचा प्रकार आहे, हा साधारणतः दोन-तीन घटकात असतो, हा दरवर्षी जोडण्यासाठी आवश्यक असतो या प्रणालीमध्ये फक्त बँक खाते एकच प्रमाणीकरण घटक होता तो देखील आता काढून टाकण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बँक खाते क्रमांक कोणालाही कळत असल्याने त्याचा गैरफायदा हॉकर्स वा अन्य व्यक्तीकडून घेतला जाण्याची शक्यता असून कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक आर्थिक गोपनीय माहितीचा गैरवापर होत असल्याचे वक्तव्य ज्येष्ठ सेवानिवृत्त अधिकारी, जलसंपदा विभाग यांनी केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने सदरहू त्रुटी प्रणालीमधून दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (०८-०१-२०२१)** : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) लेखा व कोषागारे संचालनालयास ज्येष्ठ सेवानिवृत्त अधिकारी, जलसंपदा विभाग यांचेकडून कोणताही तक्रार अर्ज प्राप्त झालेला नाही.
(४) निवृत्तीवेतन धारकाचे बँक खाते क्रमांक सुरक्षिततेच्या अनुषंगाने इतर कोणालाही दिसू नयेत, यासाठी निवृत्तीवेतन आज्ञावलीत निवृत्तीवेतन बँक खाते क्रमांक व निवृत्तीवेतन प्रदान आदेश क्रमांक (PPO) दिनांक ०३/११/२०२० पासून आच्छादित (Masking) करण्यात आले असून त्रुटी प्रणालीतून दूर करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लोखंडी सावरगांव (ता.अंबेजोगाई, जि.बीड) येथील रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या पदांना मान्यता देणेबाबत

**(४५) २१८०० (१८-०८-२०१६) श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोखंडी सावरगांव (ता.अंबेजोगाई, जि.बीड) येथे सन २००३ मध्ये स्त्री, वृध्दत्व व मनोविकार रुग्णालय मंजूर झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयाचे रुपांतर सामान्य रुग्णालयात करुन ९५% बांधकाम व इतर कामे पूर्ण झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रुग्णालयासाठी आवश्यक असणाऱ्या २०३ पदांना मान्यता मिळणेसाठी विभागाने शासनाकडे प्रस्ताव पाठवून २ वर्ष झाली तरी त्यास मान्यता दिली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०८-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ०६/०२/२००८ च्या शासन निर्णयान्वये अंबेजोगाई, जि.बीड येथे वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्राच्या स्थापनेस मान्यता देण्यात आली होती.

(२) हे अंशत: खरे आहे.

या रुग्णालयाचे रुपांतर सामान्य रुग्णालयात करण्यात आलेले नाही. सदर रुग्णालयाचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे.

(३) व (४) सदर वृध्दत्व व मानसिक आजार केंद्राकरीता दिनांक ०६/०६/२०१९ च्या शासन निर्णयान्वये ५० नियमित पदे, ६८ काल्पनिक कुशल आणि ११ काल्पनिक अकुशल मनुष्यबळ निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

---

## सार्वजनिक आरोग्य आयुक्तालय म्हणून ओळखण्याच्या आदेशाबाबत

**(४६) २८४१२ (१५-०४-२०१७) श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागाचे "सार्वजनिक आरोग्य आयुक्तालय" असे नामकरण करुन त्या अंतर्गत सहसंचालक दर्जाची चार पदे निर्माण करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी संबंधित विभागाला दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंबंधीचा शासन निर्णय, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्गमित केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागाच्या कामामध्ये सुसुत्रता आणण्यासाठी सहसंचालकांची पदे निर्माण करणे गरजेचे असताना काही अधिकाऱ्यांच्या हित संबंधामुळे ही पदे निर्माण केली जात नाहीत तसेच सदरच्या प्रकरणाची विभागाने माहिती दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सहसंचालकांची नियुक्त करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२७-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

सहसंचालकांचे एक पद दर्जोन्नत करुन संचालक (आरोग्य सेवा) असे एक वाढीव पद निर्माण करण्याबाबत आदेश दिले.

(२) हे खरे नाही.

आरोग्य सेवा संचालनालय आणि कुटुंब कल्याण कार्यक्रमावर आयुक्त आरोग्य सेवा, मुंबई (आयुक्त कुटुंब कल्याण तथा संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई) यांचे नियंत्रण प्रस्थापित करण्याबाबतचा शासन निर्णय, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

मा.मुख्यमंत्री महोदयांनी सहसंचालकांचे एक पद दर्जोन्नत करुन संचालक (आरोग्य सेवा) असे एक वाढीव पद निर्माण करण्याबाबत आदेश दिले असून, त्यानुसार शासन निर्णय, दिनांक ९/०१/२०१७ अन्वये सहसंचालक, आरोग्य सेवा या संवर्गातील एक पद दर्जोन्नत करुन संचालक, आरोग्य सेवा असे एक वाढीव पद निर्माण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील परिचारीकांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी कामबंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(४७) ३०१३६ (१७-०४-२०१७) ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील परिचारीकांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास कामबंद आंदोलन करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिचारीकांच्या मागण्या कोणकोणत्या आहेत, त्यापैकी कोणकोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत,

(३) तसेच उर्वरित मागण्या पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२८-१२-१०२०)** : (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशन यांनी दिनांक २७/०२/२०१७ च्या निवेदना अन्वये २२ मार्च, २०१७ रोजी आझाद मैदान मुंबई येथे लाक्षणिक धरणा कार्यक्रमासंबंधीची पुर्वसूचना दिलेली होती.

(२) १) बंधपत्र परिचारीकांना त्यांच्या सेवेत रुजू झालेल्या दिनांकापासून सेवेत कायम करणे.

२) दरवर्षी परिचारीकांच्या बदल्या न करता, बदल्यासंबंधी नव्याने धोरण ठरविणे.

३) २५ ऑक्टोबर, २०१६ ला वैद्यकीय शिक्षण विभागासाठी पारित केलेल्या परिचारीकांच्या गणवेशाच्या आदेशाची अंमलबजावणी होणे.

४) सर्व शासकीय रुग्णालयात इंडियन व महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलच्या मानकानुसार पदे मंजूर करुन भरणे व रिक्त होणारी सर्व पदे वेळोवेळी भरण्यात येणे.

५) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलमध्ये परिचारीकांच्या सर्टिफिकेटचे रजिस्ट्रेशनचे रिन्युअल करताना निरंतर शिक्षण योजनेतून दिलेले पॉईंट्स सक्तीचे करण्यात येऊ नयेत. ऑनलाईन रजिस्ट्रेशन असताना पैसे जमा करुन त्यातून भ्रष्टाचार संभवतो.

६) सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार प्री-रिव्हॉईज्ड वेतन, ग्रेड-पे वाढवून परिचारीकांचे सर्व भत्ते देण्यात यावेत.

त्यातील मागणी क्रमांक १ नुसार सेवानियमनासाठी दिनांक १५/०४/२०१५ पर्यंतच्या शासन सेवेतील अधिपरिचारीकांना विशेष लेखी परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात आले आहे. मागणी क्रमांक ३ नुसार सर्व राज्यात परिचारीकांच्या गणवेशाच्या आदेशाची अंमलबजावणी झालेली आहे. मागणी क्रमांक ४ च्या अनुषंगाने १०० टक्के रिक्त पद भरतीस मान्यता मिळाल्याने पद भरतीची कार्यवाही सुरु झालेली आहे. मागणी क्रमांक ६ च्या अनुषंगाने प्रस्ताव बक्षी समितीसमोर सादर करण्यात आला होता.

(३) उर्वरित मागण्यांचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबतची आरोग्य सेवा संचालनालयाकडून कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी आश्रमशाळेत अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत

**(४८) ४२२९४ (०१-०८-२०१८) डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळेत अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी रोजंदारीवर अनेक वर्षे काम करीत असून त्यांनी आपल्या मागण्यांसाठी लॉंग मार्च काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२१-१२-२०२०) :** (१) होय.

(२) व (३) शासनाने शासकीय आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी सन २०१९ मध्ये विशेष भरती प्रक्रिया राबविण्यात आली आहे. यामध्ये रोजंदारी वरील कर्मचाऱ्यांना त्या संबंधित पदावर केलेल्या सेवेच्या प्रमाणात गुणदान करण्यात आले असून त्यांना वयामध्ये सूट देण्यात आली आहे. त्यानुसार पात्र ठरलेल्या ४४५ रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील बेरोजगारांना बेरोजगार भत्ता देण्याबाबत

**(४९) ४६९९७ (०५-०७-२०१९) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी वाढली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नोटाबंदीमुळे रोजगार आणि छोटया व्यवसायांवर विपरीत परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने या बेरोजगारांना बेरोजगार भत्ता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (२१-१२-२०२०) :** (१) राज्यात कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयांतर्गत नाव नोंदणी केलेल्या उमेदवारांचा गेल्या चार वर्षांचा नोंदणीपट खालीलप्रमाणे आहे. :-

| वर्ष | नोंदणीपट |
|---|---|
| २०१७ | ३७८०५९६ |
| २०१८ | ४४०३४६६ |
| २०१९ | ४९९००१७ |
| २०२० (ऑक्टोबर अखेर) | ५२९२५५५ |

(२) नाही.
(३) व (४) या विभागांतर्गत सद्य:स्थितीत बेरोजगारांना कोणताही बेरोजगार भत्ता देण्यात येत नाही.

---

## यवतमाळ येथील माध्यमिक शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(५०) ४७४६५ (०५-०७-२०१९) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ येथील शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर माध्यमिक शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाच्यावतीने धरणे आंदोलन करण्यात आल्याचे दिनांक २ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण महामंडळाच्या मागण्या कोणत्या आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (२१-१२-२०२०) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.